Review Of Research
Vol.1,Issue.VII/April; 12pp.1-4 डॉ.एस.एच.गोने, ISSN:-2249-894X

Research Papers

# लिंग गुणोत्तराचे अभिक्षेत्रीय विष्लेशण : भोकरदन तालुका

प्रा.डी.एस.केंद्रे
भूगोल विभागप्रमुख,
उज्वल ग्रामीण महाविद्यालय
घोणसी ता.जळकोट जि.लातूर

पी.बी.गोने
एम.ए., द्वितीय वर्श (भूगोल),
श्री.हावगीस्वामी महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर

डॉ.एस.एच.गोने, प्राचार्य,
उज्वल ग्रामीण महाविद्यालय,
घोणसी ता.जळकोट जि.लातूर

**प्रस्तावना :–**

लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यासाचे मुख्य वैशिश्टय लोकसंख्येचे लिंग गुणोत्तर अभ्यासणे हे आहे. 'लोकसंख्या भूगोल' ही मानवी भूगोलाची एक मुलभूत शाखा म्हणून ओळखली जाते. लोकसंख्या भूगोलात लोकसंख्येचा अभ्यास करत असताना इतर घटकांबरोबरच लिंग गुणोत्तराच्या अभ्यासाला अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. प्रत्यक्ष जन्मदर व मृत्यूदर यावर लिंग गुणोत्तर अवलंबून असतो. लोकसंख्येचे स्थलांतर व लोकांची व्यावसायिक रचना याचा प्रत्यक्ष परिणाम लिंग गुणोत्तरावर झालेला दिसून येतो. त्या–त्या प्रदेशातील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचा प्रभाव लोकसंख्येच्या लिंग गुणोत्तरावर पडलेला दिसतो. तेथील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा, धर्म, शिक्षण, राश्ट्रीय उत्पन्न, धार्मिक परंपरा, सामाजिक रुढी, आर्थिक परिस्थिती इ. घटकांवर लिंग गुणोत्तर अवलंबून असते. भारताच्या एकूण लिंग गुणोत्तराचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, दर हजार पुरुशामागे 993 स्त्रिया आढळून येतात. तर महाराश्ट्रात हेच प्रमाण 922 असल्याचे दिसून येते. जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील लिंग गुणोत्तर हे दर हजार पुरुशामागे 954 स्त्रिया एवढे असल्याचे दिसून येते.

***अभ्यास क्षेत्र :***

भोकरदन तालुका हा जालना जिह्यातील तालुका असून तो जालना जिह्याच्या वायव्य भागात वसलेला आहे. भोकरदन हे तालुक्याचे मुख्यालय असून ते ग्रामीण वस्ती म्हणून ओळखले जाते. या तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार 20016श उत्तर ते 20027श उत्तर अक्षवृत्त व रेखावृत्तीय विस्तार 75046श पूर्व ते 75077श पूर्व रेखावृत्त यांच्या दरम्यान आहे. या तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ 1307 चौ.कि.मी. एवढे असून 2001 च्या जनगणनेनुसार या तालुक्याची एकूण लोकसंख्या 239241 एवढी आहे. या तालुक्यात एकूण 160 ग्रामीण वस्त्या आहेत. या तालुक्याचे एकूण लिंग गुणोत्तर 954 एवढे आहे. तर अनुसूचित जातीचे लिंग गुणोत्तर तालुक्याच्या लिंग गुणोत्तरापेक्षा 3 ने कमी असून ते दर हजार पुरुशामागे 951 स्त्रिया एवढे आहे. अनुसूचित जमातीचे लिंग गुणोत्तर हे तालुक्यात एकूण लिंग गुणोत्तरापेक्षा 12 ने अधिक असून ते दर हजार पुरुशामागे 966 स्त्रिया एवढे आहे. या तालुक्यास एकूण पाच जिल्ह्याच्या सिमा लाभलेल्या आहेत. भोकरदन तालुक्याच्या उत्तर व पश्चिमेस औरंगाबाद जिल्हा तर उत्तरेस काही भागास जळगाव जिल्ह्याची सीमा आहे. पुर्वेस बुलढाणा व परभणी जिल्हा तर दक्षिणेस बीड जिल्हयाची सीमा लाभलेली आहे.

***उद्दिश्टये :***

भोकरदन तालुक्यातील लिंग गुणोत्तर वितरणाचा स्थल व कालसापेक्ष अभ्यास करणे हे मुख्य उद्दिश्ट समोर ठेवून प्रस्तुत शोधनिबंध तयार केलेला आहे.

आकडेवारी संकलन व अभ्यास पध्दती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वापरलेली आकडेवारी व दुय्यम स्वरुपाची असून ती जालना जिल्हयाच्या जनगणना अहवाल 1991 व 2001 मधून घेतलेली आहे. भोकरदन तालुक्यातील पुरुश व स्त्रियांची आकडेवारी गावनिहाय संकलीत करुन त्याआधारे लिंग गुणोत्तर काढलेले आहे. या तालुक्यातील 160 ग्रामीण वस्त्यामधील संकलीत केलेल्या पुरुश व स्त्रियांच्या आकडेवारीच्या आधारे लिंग गुणोत्तर काढण्यात आले आहे. त्याकरिता प्रचलित असलेल्या खालील सुत्राचा आधार घेतलेला आहे.

लिंग गुणोत्तरü त्र एकूण स्त्रिया

तक्ता क्र.1
भोकरदन तालुक्यातील लिंग गुणोत्तर (1991–2001)

| लिंग गुणोत्तराचा गट | 1991 | टक्केवारी | 2001 | टक्केवारी | बदल | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 900 पेक्षा कमी | 18 | 11.45 | 20 | 12.50 | +2 | +1.04 |
| 901 ते 950 | 40 | 25.48 | 47 | 29.37 | +7 | 3.89 |
| 951 ते 1000 | 61 | 38.85 | 58 | 36.25 | –3 | –2.6 |
| 1000 पेक्षा अधिक | 37 | 23.57 | 35 | 21.87 | –2 | –1.7 |
| अनिवासी | 01 | 0.64 | – | – | – | – |
| एकूण | 157 | 100 | 160 | 100 | +3 | +1.91 |

स्त्रोत : जालना जिल्हा, जनगणना अहवाल, 1991 व 2001

2001 मध्ये सर्वाधिक ग्रामीण वस्त्या मध्यम लिंग गुणोत्तर असलेल्या गटात (951 ते 1000 लिंग गुणोत्तर) 58 ग्रामीण वस्त्या असून त्यांचे प्रमाण 36.25 टक्के एवढे आहे. तर सर्वात कमी ग्रामीण वस्त्या या अति कमी लिंग गुणोत्तर असलेल्या गटात (900 पेक्षा कमी लिंग गुणोत्तर) 20 (12.50 टक्के) ग्रामीण वस्त्या आहेत. 47 ग्रामीण वस्त्या या कमी लिंग गुणोत्तर (901 ते 950) येतात यांचे प्रमाणे एकूण वस्त्यांशी 29.37 टक्के एवढे आहे. तर अधिक लिंग गुणोत्तर असलेल्या गटात (1000 पेक्षा अधिक लिंग गुणोत्तर) एकूण 35 ग्रामीण वस्त्या असून यांचे एकूण वस्त्यांशी प्रमाण 21.87 टक्के एवढे आहे.

1991 व 2001 या दोन्ही जनगणना वर्शातील लिंग गुणोत्तराचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की, सर्वाधिक ग्रामीण वस्त्या या मध्यम लिंग गुणोत्तर असलेल्या गटात (951 ते 1000 लिंग गुणोत्तर) येतात तर सर्वात कमी ग्रामीण वस्त्या या अति कमी लिंग गुणोत्तर असलेल्या गटात (900 पेक्षा कमी लिंग गुणोत्तर) येतात.

अति कमी लिंग गुणोत्तर असलेल्या गटात (900 पेक्षा कमी) 1991 मध्ये एकूण 18 (11.46 टक्के) ग्रामीण वस्त्या होत्या तर याच गटात 2001 मध्ये 20 (12.50 टक्के) ग्रामीण वस्त्या होत्या. म्हणजे 1991 ते 2001 या दहा वर्शात अति कमी लिंग गुणोत्तर असलेल्या गटात फक्त 2 ग्रामीण वस्त्यांची वाढ झाली असून हे वाढीचे प्रमाण एकूण वस्त्यांशी 1.04 टक्के एवढे आहे. कमी लिंग गुणोत्तर असलेल्या गटात (901 ते 950) 1991 मध्ये 40 (25.48 टक्के) एवढया ग्रामीण वस्त्या होत्या तर 2001 मध्ये याच गटातील वस्त्यात 7 ने वाढ होवून त्या 47 (29. 37 टक्के) एवढया झाल्या. या गटातील ग्रामीण वस्त्यात दहा वर्शात 3.89 टक्के वाढ झालेली आहे. 951–1000 लिंग गुणोत्तर असलेल्या मध्यम लिंग गुणोत्तराच्या गटात 1991 मध्ये 61 ग्रामीण वस्त्या आहेत. त्यांचे प्रमाण 38.85 टक्के एवढे होते. 2001 मध्ये या गटात 58(36.25 टक्के) ग्रामीण वस्त्या होत्या म्हणजे 1991 ते 2001 या दहा वर्शात या गटातील ग्रामीण वस्त्यात 3 ग्रामीण वस्त्या कमी झालेल्या आहेत. हे कमी होण्याचे प्रमाण 2.60 टक्के एवढे आहे. 1000 पेक्षा अधिक लिंग गुणोत्तर असलेल्या गटात 37 (23.57 टक्के) ग्रामीण वस्त्या 1991 मध्ये होत्या. 2001 पर्यंत या गटातील ग्रामीण वस्त्यात 2 ने घट होऊन त्या 35 (21.87 टक्के) एवढया झालेल्या आहेत. एकूण वस्त्यांच्या 1.7 टक्के एवढया ग्रामीण वस्त्या या गटातील कमी झालेल्या आहेत. (तक्ता क्र.1)

1991 मध्ये सर्वाधिक लिंग गुणोत्तर दर हजार पुरुशामागे 1462 स्त्रिया हे नसिराबाद या वस्तीचे असून सर्वात कमी लिंग गुणोत्तर हे 826 एवढे कोठाकोळी या गावाचे आहे. दर हजार पुरुशामागे 1000 स्त्रिया असलेल्या ग्रामीण वस्तीत कुंभारी या गावाचा समावेश होतो. या गटात 125 पुरुश व 125 स्त्रिया आढळून येतात.

2001 मध्ये सर्वाधिक लिंग गुणोत्तर जयदेववाडी या गावात असून ते दर हजार पुरुशामागे 1241 एवढे आहे. तर सर्वात कमी लिंग गुणोत्तर हे पळसखेडा भोकरदन या ग्रामीण वस्तीत असून ते दर हजारी 708 एवढे आहे. पुरुश व स्त्रिया यांचे प्रमाण सारखेच असलेल्या ग्रामीण वस्तीत सिरसगाव वाघरुळ (909), कोठा जहांगीर (445) व बामखेडा (217) या वस्त्यांचा समावेश होतो.

निश्कर्श :

भोकरदन तालुक्यातील एकूण लिंग गुणोत्तराचा अभ्यास केला असता हे स्पश्ट होते की, ज्या वस्त्यामधील लिंग गुणोत्तर हे 1000 पेक्षा अधिक आहे. त्या ग्रामीण वस्त्या रस्ते व लोहमार्गाच्या जवळ वसलेले आहेत. त्यामुळे या ग्रामीण वस्त्यांना दळणवळणाची सुविधा अधिक प्रमाणात उपलब्ध झालेल्या आहेत. या ग्रामीण वस्त्यामधील पुरुश मंडळी ही रोजगाराच्या निमित्ताने बाहेरगावाहून येतात. व तेथेच स्थायिक होतात. यामुळे या ग्रामीण वस्त्यात जास्त लिंग गुणोत्तर आढळून येते. या ग्रामीण वस्त्यांचा विकास कमी प्रमाणात झालेला दिसून येतो. ज्या ग्रामीण वस्त्याचा विकास झालेला नाही व साक्षरतेचे प्रमाण कमी असते अशा ग्रामीण वस्त्यामधील लोक रोजगार निमित्ताने स्थलांतरीत होतात. तसेच साक्षरतेचे प्रमाण कमी असलेल्या वस्तीतील लोकांच्या भावना या पुत्रप्राप्तीच्या असतात. त्यामधून अधिक मुलींना जन्म दिल्याचे दिसून येते. यामुळे या वस्त्यात लिंग गुणोत्तर वाढलेले दिसून येते. ग्रामीण वस्त्यामधील साक्षरतेचे प्रमाणे अधिक असेल आणि ग्रामीण वस्त्यांचा विकास झालेला असेल तर त्या वस्त्यामध्ये बाहेरुन येऊन लोक स्थलांतरीत होणाऱ्यामध्ये पुरुशांमध्ये प्रमाण अधिक असते. अशा ग्रामीण वस्त्यामधील लिंग गुणोत्तर कमी झाल्याचे दिसून येते. तसेच विकसित वस्त्यांमधील लोकांच्या भावना मुलींना जन्म घालण्याच्या बाबतीत जागरुक असतात व त्यामधून मुलींच्या जन्माचे प्रमाण घटते. त्याचा लिंग गुणोत्तरावर परिणाम होवून तेथील लिंग गुणोत्तर कमी झाल्याचे दिसून येते.

***संदर्भ :***

1) भारतीय जनगणना अहवाल जिल्हा जालना, 1991–2001

2) Mehta, B.C. (1978) : “A Regional Population Growth-A Case Study of Rajasthan”, Jaipur, P.89

3) Mohankumar, M.D. and Shivlingappa, B.N. (2003)) : “Pattern of Sex Ratio in Karnataka-A Spatio Temporal Analysis”, National Geographer, Vol.38, No.2, Pp.149-158.

4) Trewartha, G.T. (1969) : “A Geography of Population : World Patterns”, John Wiley and Sons, Inc. New York, P.114.

5) गोने सदानंद व गोने पद्माकर (2012) चाकूर तालुक्यातील लिंग रचनेचे अभिक्षेत्रीय वितरण, शोधांकन स्पेशल इश्यू, पृ.क्र.77–79